# पुणे जिल्हा परिषद , पुणे

शिक्षण विभाग (प्राथमिक)

यशवंतराव चव्हाण भवन, 1 वेलस्ली रोड कॅम्प, पुणे 411 001

ई मेल punezpprivate@gmail.com वेबसाईट https://punezp.mkcl.org

जा.क्र.जि.प.शिक्षण / प्राथ / खाप्राशा1 / 1537/2023 / ५५५६ दिनांक - 05/09/2023

प्रति,

श्री. अमोल जंगले

गटशिक्षणाधिकारी , पंचायत समिती खेड, जि.पुणे

विषय :- प्रथम मान्यता इयत्ता 1 ली ते इयत्ता 5 वी चे प्रस्ताव पडताळणी करून पाठवणेबाबत.

संदर्भ :- 1.शासन मान्यता -क्र.एसएफएस-1021/प्र.क्र.434/एसएम-2, दिनांक26/04/2022

2.शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-204/मान्यता/पुवि/2023/1698, दिनांक 03/02/2023

संदर्भिय विषयांन्वये प्रथम मान्यता प्रमाणपत्र देणेसाठी प्राथमिक /माध्यमिक शाळेने खालील शाळेचा विहित नमुन्यातील प्रथम मान्यता प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव - | दरेकर सोशल फाऊंडेशन पाईट, खेड, जि. पुणे |
| शाळेचे नाव व पत्ता - | द ईलाईट स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज , कोये, ता. खेड, जि. पुणे |
| UDISE NO - | 27250808103 |
| प्रस्ताव प्राप्त दिनांक - | 23/08/2023 |

संदर्भिय विषयानुसार आपण समक्ष उक्त शाळेस भेट देऊन बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 आणि बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, 2011 मधील तरतुदीनुसार आवश्यक भौतिक सुविधा व कागदपत्रे परीपुर्ती बाबत पडताळणी करावेत आणि विहित नमुन्यामध्ये अहवाल सादर करावेत. प्रस्तावासोबत दिलेल्या चेकलिस्टप्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त बाबीचा विचार करता वर नमूद केलेल्या शाळेने मागणी केलेल्या इयत्तासाठी व नमूद केलेल्या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम मान्यता तपासणी करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

1) वरील शाळेस आपण स्वतः शाळांना समक्ष भेट देऊन भौतिक सुविधांची पडताळणी व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करुन प्रस्ताव पृष्ठांकनासह या कार्यालयास सादर करण्यात यावा.

2) शाळेस अधिकारी यांनी भेट दिल्यावर 10 भौतिक सुविधा मानके व प्रमाणकांचे Geo Tagging फोटो काढून प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य असेल.त्या फोटोमध्ये भौतिक सुविधा, भेट देणारे अधिकारी व शाळेचे मुख्याध्यापक यांचा समावेश असावा व भौतिक सुविधा स्पष्टपणे दिसतील असे फोटो असावेत.

3) स्थळ पाहणी अहवालावर आपली स्वयंस्पष्ट शिफारस आवश्यक राहील.अटी व शर्तीसह शिफारस देऊ नये. स्थळ पाहणी अहवालात खाडाखोड असू नये,व्हाईटनरचा वापर असू नये, स्थळ पाहणी अहवालावर तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी असावी.

4) शाळा मान्यता दिलेल्या ठिकाणी भरविली जात नसेल,अनधिकृत शाळा अथवा अनधिकृत वर्ग सुरु असतील, भौतिक सुविधा निकष पूर्ण न होणाऱ्या शाळा असतील तर अशा शाळांच्या बाबतीत **प्रथम मान्यता** देण्याची शिफारस केल्यास अशा प्रकरणी संपूर्ण जबाबदारी आपली राहील. तसेच सदरची बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणण्यात येईल.

5) या पत्रातील QR CODE स्कॅन करून तपासणी नमुना प्राप्त करून घ्यावा. आपणाकडे प्रस्ताव तपासणीसाठी दिल्यानंतर तपासून तात्काळ या कार्यालयाकडे आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पाठवण्यात यावेत.

सोबत:- 1 . उक्त शाळेचा मूळ प्रस्ताव

(संध्या गायकवाड)

शिक्षणाधिकारी प्राथमिक

जिल्हा परिषद पुणे

Received 26/9/2023
नोंदणी लिपिक
पंचायत समिती खेड
(शिक्षण विभाग)

प्रत- मुख्याध्यापक द ईलाईट स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज

Scanned with CamScanner